**नियमीत फौजदारी खटला क्र. ५२/२०२१** **निशाणी क्र.७३**

अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.२ यांची साक्ष,
मी देवाच्या नावाने शपथ घेतो की मी जे सांगेन ते सत्य असेल,
संपूर्ण सत्य असेल आणि सत्याशिवाय दुसरे काहीही नाही.

माझे नाव : राहुल श्रीमंत शेळके,
माझे वय : ३६ वर्षे, धंदा : धोबी,
राहणार : तळवेस, उदगीर, ता. उदगीर, जि. लातूर.

**अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता श्रीमती ए. जे. चव्हाण यांच्यामार्फत**

**साक्षिदाराचा सर तपास**

१. फिर्यादी ही माझी बहीण असून तिचा विवाह हा दिनांक १५.०४.२०१२ रोजी आरोपी क्र.१ बरोबर झालेला आहे. सदर लग्नामध्ये आम्ही एक तोळा सोन्याची अंगठी, रू.५०,०००/– वरदक्षिणा देवून रितीरिवाजाप्रमाणे रू.१,५०,०००/– खर्च करून विवाह समारंभ पार पाडून दिला. लग्नानंतर माझी बहिण तिच्या सासरी एकत्रीत कुटुंबात नांदायला गेली. इतर आरोपी तिच्या पतीचे नातेवाईक आहेत. तिला ५ दिर व ५ जावा तसेच सासू सासरे आहेत. तिला आरोपींनी सुरूवातीचे ६ महिने चांगले नांदविले व त्यानंतर आरोपी तिला म्हणू लागले की, 'तुझा नवरा काही काम करत नाही, तु माहेरहून व्यवसायासाठी रू.१,००,०००/– घेवून ये'. सदर बाब इकडे आल्यानंतर मला माझ्या बहिणीने सांगितली. त्यानंतर मी व माझे वडील आरोपींकडे जावून 'सध्या आमच्याकडे तितके पैसे नाहीत, थोडे थोडे करून देतो, तोपर्यंत तुम्ही तिला चांगले नांदवा' अशी विनंती केली.

२. त्यानंतर सन २०१५ मध्ये मला माझ्या बहिणीचा अचानक फोन आला म्हणाली की, 'तुम्ही ताबडतोब इकडे या'. त्यानंतर मी व माझे वडील तिच्या सासरी गेलो असता सर्व आरोपी आम्हाला म्हणाले की, 'हिच्या नवऱ्याला उदगीरला घेवून जा व त्याला लॉन्ड्री टाकून द्या'. त्यावेळी माझ्या बहिणीने उदगीरला येण्यास नकार दिल्यावर तिची सासू शारदा व जाऊ महादेवी यांनी माझ्या बहिणीच्या केसाला धरून केस लुचले. त्यावेळी तिचा मावस दिर नागेश मडीवाळ व राजु मडीवाळ यांनी माझ्या बहिणीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. संजू मडीवाळ व विजू मडीवाळ त्यावेळी आरोपींना चिथावणी देत होते. त्यावेळी आरोपींना आम्ही समजावून सांगत होतो परंतु त्यांनी ऐकले नाही.

३. त्यानंतर आम्ही माझ्या बहिणीला तिच्या दोन मुलांसह घेवून उदगीरला आलो

व तिला पारकट्टी गल्ली, उदगीर येथे भाड्याने घर घेवून दिले. दरम्यान काही दिवसानंतर अचानक तिचे पती, संजू मडीवाळ, दिर विजू मडीवाळ हे सदर भाड्याच्या घरी आले व 'तु अद्याप एक लाख रूपये घेवून आली नाहीस', असे म्हणून शिवीगाळ व मारहाण केली. त्यावेळी तिच्या घरातील पैसे ते लोक घेवून गेले. त्यानंतर काही दिवसांनी मी माझ्या बहिणीच्या सदर घरी गेलो असता तिने मला सदर बाब सांगितली.

४. एके दिवशी साई मडीवाळ या मुलाचा मला फोन आला व त्याने सांगितले की, 'तुमच्या भावजीचे माझ्या बहिणीशी लग्न पंढरपूर येथे झाले आहे'. तसेच त्याने असे देखील सांगितले की, 'त्याची चुलत बहिण ज्योती हिने सदर लग्न घडवून आणले आहे'. त्यानंतर आम्ही तिच्या सासरी गेलो. त्यावेळी माझ्या बहिणीचा नवरा व दुसरी बायको देविका हे पती पत्नी म्हणून तेथे एकत्र राहत होते. आम्ही माझ्या बहिणीच्या पतीला त्याबाबत विचारले असता त्याने 'मी दुसरे लग्न केले आहे, तुम्हाला काय करायचे आहे ते करा' असे म्हणाला. माझी बहिणीचा यातील सर्व आरोपींनी रू.१,००,०००/– च्या बेकायदेशीर मागणीची पुर्तता न झाल्याने छळ केला आहे.

सर तपास पूर्ण.

**आरोपींतर्फे विधीज्ञ श्री. आर. एम. बिराजदार यांच्यामार्फत साक्षीदाराचा उलट तपास सुरू.**

५. माझ्या बहिणीचा विवाह ठरविताना आम्ही सर्वंकष चौकशी केली होती. त्यांनी त्यावेळी मुलगा नगर परिषदेमध्ये नोकरी करतो असे सांगितले होते. आरोपी क्र. १ हा नगर परिषदेमध्ये नोकरी करीत होतो ही बाब पोलिसांनी सांगितली नव्हती. आता झाले गेले असे समजून मी सांगितले नाही. आरोपी क्र. १ ला ४ सख्खे भाऊ आहेत. त्यांची नावे मी सांगू शकतो. ते असे की, संजू, राजू, रमेश, उमेश. ते सर्वजण धोबी काम करतात. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीचा लग्नाचा खर्च हा आरोपी क्र. १ च्या वडिलांनी केलेला आहे. आरोपी क्र. १ चे वडील म्हणजेच माझ्या बहिणीचे सासरे हयात आहेत.

६. माझी बहिण नेमक्या कोणत्या दिनांक, वार किंवा महिन्यात उदगीरला आल्यानंतर आरोपींने तिच्याकडे पैशाची मागणी केल्याचे मला सांगितले, हे मला सांगता येत नाही.

प्रश्न– त्यानंतर तुम्ही तिच्या सासरी आरोपींना समजावून सांगण्यासाठी कधी गेला होतात?

उत्तर– आम्ही सतत वेळ आल्यानंतर जावून त्यांना समजावून सांगत होतो.

७. माहे डिसेंबर २०१५ मध्ये माझ्या बहिणीचा मला फोन आला होता. त्याचा

नेमका दिनांक, वार व महिना मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आम्ही माझ्या बहिणीच्या सासरी गेल्यानंतर तिला मी सर तपासात सांगितल्याप्रमाणे आरोपींनी मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या बहिणीला तिच्या सासू व जाऊबाईने केस लुचल्याचे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी नागेश व राजू यांनी माझ्या बहिणीला लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे मी खोटे सांगत आहे.

८. मी उदगीर येथे आल्यावर बहिणीला खोली करून दिली त्यावेळी ती धुणे भांडी करून उदरनिर्वाह भागवित होती. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ हा काही दिवस माझ्या बहिणीबरोबर सदर भाड्याच्या घरात राहत होता. माझ्या बहिणीच्या सदर भाड्याच्या खोलीवर आरोपी क्र. १ व संजू आणि विजू हे नेमक्या कोणत्या दिनांकास, वार अथवा महिन्यात आले होते, हे मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १, संजू व विजू हे माझ्या बहिणीच्या भाड्याच्या घरात येवून तिला शिवीगाळ करून मारहाण केली तसेच पैशाची मागणी करून पैसे घेवून गेले, हे मी खोटे सांगत आहे.

९. साई मडीवाळ या व्यक्तीचा मला नेमक्या कोणत्या दिनांकास, वार अथवा महिन्यात फोन आला होता, हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, मला साई मडीवाळ या व्यक्तीने आरोपी क्र. १ चा दुसरा विवाह पंढरपूर येथे झाल्याचे सांगितल्याचे मी खोटे सांगत आहे. त्यानंतर मी व माझे वडील आरोपींच्या घरी नेमक्या कोणत्या तारखेस, वार किंवा महिन्यात गेलो होतो, हे मला सांगता येत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र. १ व देविका हे पती पत्नीप्रमाणे राहत होते हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, रू.१,००,०००/– ची मागणी माझी बहिण पूर्ण करू न शकल्याने तिचा आरोपींनी छळ केला हे मी खोटे सांगत आहे.

१०. मी व माझी बहिण लहानपणापासून उदगीर शहरात राहिलेलो आहोत. आरोपींचे गाव हे खेडे गाव आहे. आरोपींचे गाव बीदर जिल्हा मुख्यालयापासून १० किमी अंतरावर आहे. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही लहानपणापासून उदगीर शहरात राहिलेली असल्यामुळे तिला तिच्या सासरच्या खेडेगावात करमत नव्हते. हे म्हणणे खरे नाही की, तिच्या अट्टहासापोटी आरोपी क्र.१ ला उदगीर येथे भाड्याने घर करून राहावे लागले होते. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादी ही उदगीर येथे भाड्याने राहत असताना आरोपी क्र.१ हा तिला पैसे पुरवित होता. हे म्हणणे खरे नाही की, एवढेच नव्हे तर माझ्या फोन पे वर देखील त्याने पैसे पाठविलेले आहेत. हे म्हणणे खरे नाही की, फिर्यादीला तिच्या सासरगावी तिला करमत नसल्याने ती निष्ठेने तेथे कधी नांदली नाही. हे म्हणणे खरे नाही की, केवळ

फिर्यादील मदत व्हावी म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी सर तपासात सांगितल्याप्रमाणे कोणत्याही आरोपीने फिर्यादीला कोणताही त्रास दिलेला नाही. नागेश घळाप्पा मडीवाळ हे गृहस्थ औराद तहसील कार्यालयात नोकरीस आहेत किंवा कसे, हे मला माहित नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी महादेवी व देविका या मौजे कवठा येथे राहत नाहीत. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी क्र.१ चा इतर आरोपींशी काहीही संबंध नाही. हे म्हणणे खरे नाही की, सर्व आरोपी आरोपी क्र. १ पासून वेगळे राहतात. हे म्हणणे खरे नाही की, केवळ फिर्यादील मदत व्हावी म्हणून मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

उलट तपास पूर्ण.

फेर तपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृती,

Digitally signed by BHALCHANDRA RAWSAHEB ZENDE
Date: 2025.08.08 17:57:32 +0530

(भालचंद्र रा. झेंडे)

दिनांक : ०८.०८.२०२५

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्या.क्र.३), उदगीर.